लोकसत्ता
नागपूर, मंगळवार, ७ ऑक्टोबर २००८

# डॉ. प्रशांत वासनकर यांचा सत्कार



डॉ. प्रशांत वासनकर यांचा सत्कार करताना विदर्भ सेवा समितीचे पदाधिकारी.

नागपूर, ६ ऑक्टोबर / प्रतिनिधी

शेअर बाजार विशेषज्ज्ञ आणि वासनकर इन्व्हेस्टमेंटचे अध्यक्ष व संचालक डॉ. प्रशांत वासनकर यांना शिकागो विद्यापीठाची आचार्य उपाधी मिळाल्याबद्दल विदर्भ सेवा समितीच्या वतीने त्यांचा हुतात्मा स्मारक भवनात नुकताच सत्कार करण्यात आला.

समितीचे अध्यक्ष पंडित उमेश शर्मा यांनी शाल व श्रीफळ देऊन वासनकर यांचा सत्कार केला. यावेळी कार्याध्यक्ष डॉ. संतोष मोदी, सचिव आनंद निर्वाण, कोषाध्यक्ष बाबूलाल नेवाटिया, संपर्क प्रचारक निरजनसिंह, मनोहर सोमलवार आदी पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. सत्काराला उत्तर देताना डॉ. वासनकर यांनी गुंतवणुकीची पार्श्वभूमी, शेअर बाजाराची माहिती, बॉण्ड्स, आणि गुंतवणुकीच्या पद्धतींविषयी थोडक्यात माहिती दिली. संतोष मोदी यांनी आभार मानले. ■